महाराष्ट्र वन विभाग

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
वनविभाग

Email:- rfopurada@gmail.com
GSTIN-27NGPR02580EIDL

**वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादे.) पुराडा यांचे कार्यालय**
**ता. कुरखेडा, जि. गडचिरोली. पिन नंबर 441209**

क्रमांक/वपअ/प्रादे./ **179** पुराडा, दिनांक **:- 02/08/2021**

विषय :- दोन शासकीय पंच मिळणेबाबत.

प्रति,

प्रभारी अधिकारी ,
पोलीस स्टेशन, पुराडा
जिल्हा- गडचिरोली

संदर्भ :- 1) आपले पत्र क्रमांक 679/2021 दिनांक 02/08/2021
2) महाराष्ट्र वन नियमावली , 2014 नियम 79

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भीय पत्रान्वये आपण खालील स्वरुपाचे आदेश दिलेले आहेत.

*" दिनांक 25/07/2021 रोजी पोलीस स्टेशन पुराडा अपराध क्रमांक 022/2021 कलम 3,4 स्फोटक पदार्थ अधिनियम 1908, कलम 16,18,20,23 युएपी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले असुन, सदर गुन्हयाचे तपासात घटनास्थळाचा दिसत्या व पाहील्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा कार्यवाही करणे गरजेचे आहे, त्याकरीता दोन शासकीय पंचांची आवश्यकता आहे, तरी आपले कार्यालयातील अधिनस्त दोन शासकीय कर्मचारी यांची पंच म्हणुन हजर राहणेविषयी लेखी स्वरुपात नियुक्ती करण्यात यावे व त्यांना दिनांक 02/08/2021 रोजी शासकीय पंच म्हणुन हजर राहण्याची समज देण्यात यावी. "*

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार- अ , असाधारण क्रमांक 35 दिनांक 26/02/2014 अन्वये महाराष्ट्र वन नियमावली , 2014 प्रकाशीत झालेली असुन नियम क्रमांक 79 मध्ये खालीलप्रमाणे नमुद करण्यात आलेले आहे.

**(कृपया मागे पहावे.)**

Scanned with CamScanner

" **वनरक्षकाने, महसूल किंवा पोलीस अधिका-यांकडे हजर होण्यासाठी नियतक्षेत्र सोडू नये.** - कोणताही महसूल किंवा पोलीस अधिकारी, वनरक्षकास त्याच्या नियतक्षेत्राबाहेर बोलविणार नाही किंवा वनरक्षक हे महसूल अथवा पोलीस अधिकारी यांचेकडे हजर होण्यासाठी नियतक्षेत्र सोडणार नाही. "

तेंव्हा, संदर्भीय क्रमांक 1 अन्वये आपल्याव्दारे आदेशीत केलेली कोणतीही कार्यवाही खालील स्वाक्षरीकर्ते यांना योजने शक्य होणार नाही ; याची कृपया नोंद घ्यावी.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार- अ , असाधारण क्रमांक 35 दिनांक 26/02/2014 अन्वये महाराष्ट्र वन नियमावली , 2014 प्रकाशीत झालेली असुन सदरील राजपत्राची मराठी व इंग्रजी प्रत सहपत्रीत पाठविण्यात येत असुन यापुढे आपल्याव्दारे नियम क्रमांक 79 चे अनुपालन करण्यात यावे; ही विनंती .

करीता माहिती व पुढील उचित कार्यवाहीस्तव सस्नेह अग्रेषित.

**सहपत्रः- वरीलप्रमाणे ( पान क्र. 1 ते 59 पर्यंत )**

(बी.एच.डिगोळे)
वनपरिक्षेत्र अधिकारी
(प्रादे.) पुराडा

प्रतिलीपी :- मा. उपवनसंरक्षक, वडसा वनविभाग वडसा यांना माहितीस्तव सविनय सादर .
पतिलीपी :- मा. उपविभागीय वन अधिकारी , कुरखेडा स्थित वडसा यांना माहितीस्तव सविनय सादर .
प्रतिलीपी :- मा. उपविभागीय पोलीस अधिकारी , कुरखेडा यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव सविनय सादर.
प्रतिलीपी :- वनपाल / वनरक्षक (सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

02/08/2021

(बी.एच.डिगोळे)
वनपरिक्षेत्र अधिकारी
(प्रादे.) पुराडा

ठाणे अमलदार
पो.स्टे. पुराडा
2/08/2021

Scanned with CamScanner